# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १०/११/२०१४.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **नोव्हेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

३. सानपाडा सेक्टर ५ येथील सानपाडा स्मशानभुमीची सुधारणा व सुशोभिकरण करणे.

४. वरिष्ठ लिपीक/कर निरीक्षक या संवर्गातून अधिक्षक/वसुली अधिकारी या संवर्गात पदोन्नतीकरीता अर्हता शिथील करणेबाबत.

५. नमुंमपा क्षेत्रातील समाजमंदिरे/व्यायामशाळा/बहुउद्देशिय इमारती/सांस्कृतिक भवन/वाचनालय इमारती परवानगी व अनुज्ञा (Leave & Licence) तत्वावर देणेबाबत.

६. नमुंमपा क्षेत्रातील समाजमंदिरे/व्यायामशाळा/वाचनालय इमारती परवानगी व अनुज्ञा (Leave & Licence) तत्वावर देणेबाबत.

**ठरावाच्या सूचना :**

**७. श्रीम. रोहिणी रमेश शिंदे, यांजकडून :-**

प्र. क्र. ४८ मधील श्रध्दा अपार्टमेंट मधील काही इमारती सिडको प्रशासनाने खाली केलेल्या इमारती आहेत. तेथे इमारतीच्या आवारात संपूर्ण कचरा व घाणीचे साम्राज्य आहे. तेथे कोणतीही साफसफाई होत नाही. तरी तेथे प्रशासनाने संपूर्ण कचरा हटविणे व स्वच्छता ठेवणे कारण तेथे दुर्गंधीमुळे मच्छर मोठया प्रमाणात वाढलेले आहे व त्या विभागात डेंग्यु व मलेरीयाची लागण मोठया प्रमाणात वाढलेली आहे. तरी याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

**८ व ९. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

(८) प्र. क्र. ७१, नेरुळ, सेक्टर - २९ येथील साईस्थान सोसायटी समोरील मैत्री टावरचे प्लॉट ११ पर्यंत गटार व फुटपाथची पेवरब्लॉक बसवुन सुशोभिकरण करणे. (९) प्र. क्र. ७१, नेरुळ, सेक्टर - १अ, सेक्टर - ३ आणि सेक्टर - ११ अंतर्गत रस्त्यांचे सीलकोट डांबरीकरण करणे.

**१० व ११. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

(१०) प्र. क्र. २२, संभाजी नगर येथे १० वर्षे पुर्वी टाकलेली पाण्याची पाईप लाईन खराब असल्याने पाण्याची समस्या जाणवत आहे. तरी तेथे पाण्याची नवीन पाईप लाईन टाकण्यात यावी तसेच संभाजी नगर येथे व्यक्तिक (घरगुती) नळ जोडणी बाबत परवानगी मिळावी. (११) प्र. क्र. २२, सुलाई देवी वारली पाडा येथे पाणी पुरवठा नळाद्वारे देणे.

**१२ ते १४. श्री. संतोष देवाप्पा शेट्टी, यांजकडून :-**

(१२) प्र. क्र. ७२, नेरुळ सेक्टर १, ३, ५, ७, ९, ११, १५, १७ व १९ या परिसरात सांस्कृतीक, सार्वजनिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी व खेळण्यासाठी मैदान नाही. तरी जसे सीबीडी मध्ये स्व. राजीव गांधी मिनी स्टेडीअम बांधलेले आहे तशा प्रकारचे मिनी स्टेडीअम नेरुळ सेक्टर ९ मध्ये आर्मी कॉलनी लगत असलेल्या भूखंड क्र. १२ ए, तुलसी मैदान येथे बांधण्यात यावे जेणेकरुन एक ते दिड लाख रहिवाशांना चागली सोय उपलब्ध होईल. (१३) प्र. क्र. ७२, नेरुळ सेक्टर ९ मध्ये पाण्याच्या टाकीलगत ८ए हा मोकळा भूखंड आहे. महानगरपालिकेचे लक्ष नसल्यामुळे येथे अनधिकृत झोपडया बांधल्या जातात. तरी या भूखंडावर व्यायामशाळा व वाचनालय बांधणे. (१४) प्र. क्र. ७२, सिडको कंडोमिनिअम अंतर्गत सिवरेज लाईन, पदपथ व पेव्हरब्लॉक बसविण्याची कामे महानगरपालिकेने केलेली आहेत. काही प्रभागांमध्ये अशा प्रकारची कामे करण्याची राहीली आहेत तर काही ठिकाणच्या कामांचे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत, काही ठिकाणच्या कामांचे टेंडर सुध्दा निघालेले आहेत. परंतु आपल्या प्रशासनाने शासनाची कारणे दाखवून ही कामे थांबविलेली आहेत. यामुळे रहिवाश्यांमध्ये मतभेद निर्माण होत आहेत. तरी महासभेला विनंती आहे की, यासाठी मार्ग काढुन सिडको कंडोमिनिअम मधील उरलेली कामे करण्यासाठी उपायोजना करणे.

**१५ ते १७. श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**

(१५) प्र. क्र. १, ईश्वरनगर येथे मनूभाई चाळीमागील बाजूस आर.सी.सी. गटार बांधण्याची तरतूद करणे. (१६) प्र. क्र. १, ईश्वरनगर विभागात वाढीव लोकसंख्या पहाता ईश्वरनगर येथे बैठे शौचालय काढून तेथे नविन जी + १ शौचालय बांधण्याची तरतूद करणे. (१७) प्र. क्र. १, ईश्वरनगर मधील समाजमंदिर - बंजारपाडा परिसरात सन २००० सालापसून असलेली सर्व जुनी गटारे व पदपथ आणि झाकण नव्याने करण्याची तरतूद करणे.

**१८ ते २०. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(१८) नमुंमपा शाळा क्र.१७ सेक्टर २३, जुईनगर या शाळेच्या इमारतीवर शाळेतील मुलांना सांस्कृतिक कार्यक्रम करण्याकरीता वाढीव बांधकाम करणे. (१९) प्र. क्र. ६५, जुईनगर, सेक्टर २२,२३,२४ व २५ मधील नागरीकांकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र बनविणे. (२०) प्र. क्र. ६५, जुईनगर, सेक्टर २३ येथील नवरात्रोत्सव चौक ते सेक्टर २२ रेल्वे हॉस्पीटल पर्यंत संरक्षण भिंतीच्या बाजुला पदपथ बनविणे.

**२१. श्री. मधुकर बाबु मुकादम, यांजकडून :-**

प्र. क्र. ४०, पावणे गावामधील विदयुत वाहिन्या भूमिगत करताना पदपथावरील इंटरलॉक खराब झाले असून त्या जागी नवीन इंटरलॉक बसवणे.

**२२ ते २४. श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिष्ट, यांजकडून :-**

(२२) प्र. क्र. ५, इलठणपाडा साईसेवा चाळ, अष्टविनायक चाळ, हिदौंले चाळ येथिल रहिवाशी करिता व आदिवाशी पाडा, हरिओम दत्त रहिवाशी संस्था, या रहिवाशीकरिता सार्वजनिक शौचालय बनवणे. (२३) प्र. क्र. ५, इलठणपाडा पूष्पासिंग चाळ ते रेल्वे धरणापर्यंत पावसाळी नाला संरक्षणभित बनवणे. (२४) प्र. क्र. ५, कन्हैयानगर पूर्व दुर्गामंदिर, हरिओम चाळ, हनुमानमंदिर मागील परिसर, नवी मुंबई महानगरपालिका चावडीच्या मागे व चावडी शेजारी गटारे व पदपथ व पदपथ ब्रिज बनवणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १० नोव्हेंबर २०१४.**